**प्रेस नोट**

पारोळा पोलीस स्टेशन
दिनांक 11/06/2026

दिनांक 08/06/2026 रोजी रात्री 09.30 वाजेचे सुमारास पिंपरखेड मारोती मंदिर उत्रड शिवार ता.पारोळा एक अनोळखी इसम मंदिरात आला व काही वेळ मंदिरात थांबल्या नंतर दर्शन घेवुन निघुन गेला होता. त्यानंतर तेथील पुजारी फिर्यादी नामे आसाराम त्र्यंबक पाटील(पुजारी) रा.बहादरपुर ता.पारोळा यांनी सदर मंदिर बंद करुन झोपुन गेले होते. त्यानंतर दिनांक 09/06/2026 रोजी सकाळी 05.30 वाजेचे सुमारास मारोती मंदिराची साफसफाई करीत असतांना मारोती मुर्ती वरील चांदीचे मुकुट व कानावरील चांदीच्या मासोळी असे मारोती मुतींवर दिसुन न आल्याने त्यावरुन पारोळा पोलीस स्टेशन येथे मंदिरातील पुजारी नामे आसाराम त्र्यंबक पाटील यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार गेले मालाचे वर्णन

1) 50,000/- **रुपये किंमतीचा चांदीचा 500 ग्रॅम वजनाचा मारुती मुर्तीचा मुकुट**
2) 15,000/- **रु.कि.चा चांदीचा 150 ग्रॅम वजनाची मारुती मुर्तीच्या कानातील चांदीची मासळी**

**असा एकुण** 65,000/- रु किं.चा मुद्देमाल सदर अज्ञात चोरट्याने पिंपरखेड मारोती मंदिरातुन चोरुन नेला होता. त्यावरुन पारोळा पोलीस स्टेशन येथे **दि.09/06/2026 रोजी सीसीटीएनएस गुरन**-210/2026 **भारतीय न्याय संहिता कलम**-305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या वरुन पारोळा पोलीस स्टेशन येथे सपोनि योगेश महाजन यांनी सदर तपासाच्या चौकशी संदर्भात पारोळा पोस्टे चे पोह-1388 कैलास साळुंखे, पोह-3074 संदिप अशोक सातपुते, पोकॉ/1745अजय बाविस्कर, पोकॉ/918आकाश माळी, पोकॉ/1257सुनिल पाटील, पोकॉ/1612 अभिजीत पाटील, पोकॉ/1800 गिरिश सोनवणे, पोकॉ/2258 अनिल राठोड यांच्या पथकाने सदर मारोती मंदिरातील सी.सी.टी.व्ही.फुटेज प्राप्त करुन व त्या दिशेने तपासाची चक्रे फिरवुन गोपनिय माहितीच्या आधारे सी.सी.टी.व्ही. फुटेजच्या आधारे तपास करता हिरापुर ता.पारोळा येथील हिरालाल अरुण पाटील या संशयीतास ताब्यात घेतले व त्या बाबत त्याची विश्वासात घेवुन विचारपुस व चौकशी करता त्याने दि.08/06/2026 रोजी मीच रात्री पिंपरखेड मारोती मंदिरात **मुर्तीचा चांदीचा मुकुट व मुर्तीच्या कानातील मासळी चोरले** असले बाबत त्याने गुन्ह्याची कबुली देवुंन तसेच आरोपी **हिरालाल अरुण पाटील रा.हिरापुर ता.पारोळा** याच्या राहत्या घरातुन त्याने मारुती मंदिरातील चोरी केलेला मुद्देमाल ताब्यात घेवुन नमुद गुन्ह्यात त्यास अटक करुन गुन्ह्याचा तपास पोह-1388 कैलास साळुंखे हे करित आहेत.

**तरी सदरची कारवाई ही मा.पोलीस अधिक्षक सो .श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधिक्षक सो.श्री.अशोक नखाते, मा.SDPO अमळनेर भाग श्री विनायक कोते याच्या मार्गदर्शनाखाली सपोनि योगेश महाजन,पोह-1388 कैलास साळुंखे, पोह-3074 संदिप अशोक सातपुते, पोकॉ/1745अजय बाविस्कर, पोकॉ/918आकाश माळी, पोकॉ/1257 सुनिल पाटील, पोकॉ/1612 अभिजीत पाटील, पोकॉ/1800 गिरिश सोनवणे, पोकॉ/2258 अनिल राठोड यांनी करुन सदर गुन्हा उघडकिस आणला आहे.**


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पारोळा पोलीस स्टेशन